लोकमत

# दादरमध्ये 'चित्रपताका' महोत्सव १२ ते १५ नोव्हेंबर काळात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्य शासनाचा अधिकृत 'चित्रपताका' चित्रपट महोत्सव यंदा १२ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रभादेवीतील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित करणार अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे शेलार यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्य विभागाची आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत मंत्री शेलार यांनी ही माहिती दिली. यावेळी विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, उपसचिव नंदा राऊत तसेच उपसचिव महेश वाव्हळ उपस्थित होते.

**सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी माहिती दिली.**

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत गेल्या वर्षापासून महोत्सव सुरू करण्यात आला आहे.

Hello Mumbai
Page No. 4 Apr 08, 2026
Powered by: erelego.com

दैनिक
कोकणचे मुखपत्र
सागर
शनिवार ०४ एप्रिल २०२६

# महिला दिन विशेष अंकातून मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्वाचा वेध



**मुंबई** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने निर्मित व प्रकाशित केलेल्या 'चित्रपताका' या पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन संपादक तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' या विषयावर आधारित हे मासिक असून जानेवारी ते मार्च या तीन महिन्याच्या अंकात मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्रीप्रतिमा आणि स्त्रीच्या सर्जनशील सहभागाचा वेध घेणारे लेख समाविष्ट केले आहेत.

सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा उद्योग नसून तो समाजाच्या भावविश्वाचा आरसा आहे. म्हणूनच या माध्यमाभोवती घडणाऱ्या चर्चांना आणि विचारमंथनाला एक सर्जनशील व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सिनेमा या व्यापक कलामाध्यमाभोवती घडणारे विचारप्रवाह, त्यासंबंधीचे अनुभव आणि स्मृती यांविषयीचा रचनात्मक संवाद घडावा या उद्देशाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून 'चित्रपताका' हे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीतील बदलते प्रवाह, नव्या पिढीचे प्रयोग, सिनेउद्योगासमोरील आव्हाने आणि संधी, तसेच या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांचे अनुभव आणि चिंतन वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या त्रैमासिकाचे कार्यकारी संपादक आणि प्रकाशक तथा सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी जबाबदारी पार पाडली आहे. तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार मुख्यलेखावित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, विशेष कार्यकारी अधिकारी सुचित्रा देशपांडे यांनी संपादकीय सल्लागार जबाबदारी सांभाळली आहे.

'चित्रपताका' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचा आढावा

मराठी चित्रपटांमधील स्त्री-पात्रांच्या बदलत्या प्रवासाचा आढावा घेणारा लेख या अंकात आहे. समाजातील बदलते संदर्भ, स्त्रीस्वातंत्र्याच्या संकल्पना आणि बदलती मूल्यव्यवस्था यांचा प्रभाव मराठी चित्रपटांतील स्त्रीप्रतिमांवर कसा उमटत गेला, याचे सूक्ष्म निरीक्षण या लेखातून समोर येते. याशिवाय मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्री-दिग्दर्शकांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा लेखही या अंकात वाचायला मिळेल. दिग्दर्शनासारख्या सर्जनशील आणि नेतृत्वात्मक क्षेत्रात महिलांनी केलेल्या कामाचा मागोवा घेताना त्यांच्या कलात्मक दृष्टीचा, प्रयोगशीलतेचा आणि अभिव्यक्तीच्या वैविध्याचा परामर्श घेतलेला लेख या अंकात वाचता येईल. प्रसिद्ध अभिनेत्री छाया कदम हिची मुलाखत, प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल यांनी चित्रनगरीबद्दल जागवलेल्या आठवणी या अंकात वाचता येतील. त्याचबरोबर बर्लिनच्या चित्रपट महोत्सवाचा प्रवास, मंथन उपक्रमाचा आढावा, या अंकात घेण्यात आला आहे.

# ‘चित्रपताका’ पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन

## मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्वाचा वेध



▶ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने निर्मित व प्रकाशित केलेल्या ‘चित्रपताका’ या पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन बुधवार, १ एप्रिल २०२६ रोजी संपादक तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ‘आंतरराष्ट्रीय महिला दिन’या विषयावर आधारित हे मासिक असून जानेवारी ते मार्च या तीन महिन्याच्या अंकात मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्रीप्रतिमा आणि स्त्रीच्या सर्जनशील सहभागाचा वेध घेणारे लेख समाविष्ट केले आहेत.

सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा उद्योग नसून तो समाजाच्या भावविश्वाचा आरसा आहे. म्हणूनच या माध्यमाभोवती घडणाऱ्या चर्चांना आणि विचारमंथनाला एक सर्जनशील व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने सिनेमा या व्यापक कलामाध्यमाभोवती घडणारे विचारप्रवाह, त्यासंबंधीचे अनुभव आणि स्मृती यांविषयीचा रचनात्मक संवाद घडावा या उद्देशाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून ‘चित्रपताका’ हे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे.

लोकमत



# भारतमातामध्ये 'सुपर डुपर'चा जल्लोषात प्रीमिअर !

मराठी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाचा साक्षीदार ठरलेले भारतमाता चित्रपटगृह तब्बल सहा वर्षांनंतर पुन्हा नव्या दिमाखात सुरू झाले आणि या नव्या रूपाच्या अनावरणाचा मान मिळाला तो झी स्टुडिओजच्या 'सुपर डुपर' या बहुप्रतीक्षित मराठी चित्रपटाला ! या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत नुकताच या चित्रपटाचा भव्य प्रीमिअर सोहळा भारतमाता येथे अत्यंत जल्लोषात आणि मराठमोळ्या थाटात पार पडला.

ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वातावरणात साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे केले. मराठी संस्कृतीचा अभिमान आणि चित्रपटाचा उत्सव अशा दुहेरी स्वरूपात हा कार्यक्रम रंगला. यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, फिल्म सिटी कॉर्पोरेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, झी स्टुडिओजचे चीफ बिझनेस ऑफिसर उमेश कुमार बन्सल, झी स्टुडिओज मराठीचे व्यवसायप्रमुख बवेश जानवलेकर, सुपर डुपर चित्रपटातील कलाकार तंत्रज्ञ, निर्माते विजय शिंदे आणि नरेश बोर्डे यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार म्हणाले की, 'भारतमाता' थिएटरसोबत माझ्या अनेक भावनिक आठवणी जोडल्या गेल्या आहेत. हे केवळ एक चित्रपटगृह नाही, तर अनेक पिढ्यांच्या आठवणींचा जिवंत ठेवा आहे. मराठी माणसाच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा वारसा लाभलेलं हे एक महत्त्वाचं केंद्र आहे. मराठी चित्रपटाचा पहिला प्रीमियर इथे आयोजित केल्याबद्दल मी झी स्टुडियोजचे मनःपूर्वक आभार मानतो. सिंगल स्क्रीनचे चित्रपटगृह चालवणं सोपं नाही, त्यामुळे ते सातत्याने सुरू राहावं, यासाठी मी सर्व मराठी प्रेक्षकांनी या ठिकाणाला आपला पाठिंबा आणि आशीर्वाद द्यावेत. 'सुपर डुपर'च्या संपूर्ण टीमचं मी मनापासून अभिनंदन करतो. उत्कृष्ट कलाकार आणि चित्रपटाचं तंत्र जाणणाऱ्या या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा."

दिग्दर्शक समीर आशा पाटील म्हणाले, 'सुपर डुपर' हा चित्रपट आनंद, प्रेम आणि उत्साह घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहे आणि हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरेल, अशी मनापासून अपेक्षा व्यक्त करतो."

तर झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले, " 'भारतमाता' थिएटरमध्ये आमच्या चित्रपटाचा प्रीमियर करण्याची ही संधी जेव्हा आमच्यासमोर आली, तेव्हा ती गमावण्याचा प्रश्नच नव्हता. ज्या चित्रपटगृहाने मराठी चित्रपटसृष्टीचा समृद्ध इतिहास घडवला आहे, त्याच ठिकाणी 'सुपर डुपर' हा चित्रपटही नवा इतिहास घडवेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे."

ठाणे वार्ता

बातमी तीच, जी सत्य असेल!

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे 'चित्रपताका' त्रैमासिक प्रकाशित

**मुंबई:**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने निर्मित व प्रकाशित केलेल्या 'चित्रपताका' या पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन बुधवार, १ एप्रिल २०२६ रोजी संपादक तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' या विषयावर आधारित हे मासिक असून जानेवारी ते मार्च या तीन महिन्याच्या अंकात मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्रीप्रतिमा आणि स्त्रीच्या सर्जनशील सहभागाचा वेध घेणारे लेख समाविष्ट केले आहेत. सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा उद्योग नसून तो समाजाच्या भावविश्वाचा आरसा आहे. म्हणूनच या माध्यमाभोवती घडणाऱ्या चर्चांना आणि विचारमंथनाला एक सर्जनशील व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सिनेमा या व्यापक कलामाध्यमाभोवती घडणारे विचारप्रवाह, त्यासंबंधीचे अनुभव आणि स्मृती



यांविषयीचा रचनात्मक संवाद घडावा या उद्देशाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून 'चित्रपताका' हे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीतील बदलते प्रवाह, नव्या पिढीचे प्रयोग, सिनेउद्योगासमोरील आव्हाने आणि संधी, तसेच या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांचे अनुभव आणि चिंतन वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या त्रैमासिकाचे कार्यकारी संपादक आणि प्रकाशक तथा सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी जबाबदारी पार पाडली आहे. तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार मुख्यलेखावित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, विशेष कार्यकारी अधिकारी सुचित्रा देशपांडे यांनी संपादकीय सल्लागार जबाबदारी सांभाळली आहे.

## 'चित्रपताका' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचा आढावा

मराठी चित्रपटांमधील स्त्री-पात्रांच्या बदलत्या प्रवासाचा आढावा घेणारा लेख या अंकात आहे. समाजातील बदलते संदर्भ, स्त्रीस्वातंत्र्याच्या संकल्पना आणि बदलती मूल्यव्यवस्था यांचा प्रभाव मराठी चित्रपटांतील स्त्रीप्रतिमांवर कसा उमटत गेला, याचे सूक्ष्म निरीक्षण या लेखातून समोर येते. याशिवाय मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्री-दिग्दर्शकांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा लेखही या अंकात वाचायला मिळेल. दिग्दर्शनासारख्या सर्जनशील आणि नेतृत्वात्मक क्षेत्रात महिलांनी केलेल्या कामाचा मागोवा घेताना त्यांच्या कलात्मक दृष्टीचा, प्रयोगशीलतेचा आणि अभिव्यक्तीच्या वैविध्याचा परामर्श घेतलेला लेख या अंकात वाचता येईल. प्रसिद्ध अभिनेत्री छाया कदम हिची मुलाखत, प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल यांनी चित्रनगरीबद्दल जागवलेल्या आठवणी या अंकात वाचता येतील. त्याचबरोबर बर्लिनच्या चित्रपट महोत्सवाचा प्रवास, मंथन उपक्रमाचा आढावा, या अंकात घेण्यात आला आहे.

April 4, 2026 | Page no: 4 | Thane
Powerd by - Amol Surve | 9869329948

# 'चित्रपताका' त्रैमासिक प्रकाशित

## मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्रीप्रतिमेचा वेध

मुंबई, ता. २ : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या 'चित्रपताका' या पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन संपादक तथा दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

'आंतरराष्ट्रीय महिला दिन' या विषयावर आधारित हे मासिक असून, जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या अंकात मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्रीप्रतिमा आणि स्त्रीच्या सर्जनशील सहभागाचा वेध घेणारे लेख समाविष्ट आहेत. या त्रैमासिकाचे कार्यकारी संपादक आणि प्रकाशक तथा सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी जबाबदारी पार पाडली आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार मुख्य लेखावित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, विशेष कार्यकारी अधिकारी सुचित्रा देशपांडे यांनी संपादकीय सल्लागार जबाबदारी सांभाळली आहे. या माध्यमातून चित्रपटसृष्टीतील बदलते प्रवाह, नव्या पिढीचे प्रयोग, आव्हाने वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



मुंबई : 'चित्रपताका' या त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

लोकमत

# ६२ वे राज्य मराठी चित्रपट पुरस्कार जाहीर

## प्राथमिक फेरीची नामांकने आणि तांत्रिक व बालकलाकारांच्या नावांची घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ६२ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकन आणि तांत्रिक व बालकलाकार विभागातील पुरस्काराची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी केली. २०२४ या वर्षातील राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या अंतिम फेरीसाठी स्थळ, छबिला, कुर्ला टू वेंगुर्ला, धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज, घात, स्वरगंधर्व सुधीर फडके, घरत गणपती, नवरदेव बीएस्सी.ॲग्री., नाच गं घुमा, मुक्काम पोस्ट देवाचं घर या दहा चित्रपटांना अंतिम फेरीचे नामांकन प्राप्त झाले आहे.

उत्कृष्ट बालकलाकार म्हणून सावित्रीच्या लेकी चित्रपटातील धनश्री भोसले, दृष्टी मोरे, रसिका खंडागळे, एजल कालीकुरी यांना पुरस्कार जाहीर



झाला आहे. अंतिम घोषित पारितोषिकांमध्ये तांत्रिक विभागात उत्कृष्ट कला दिग्दर्शन - संतोष फुटाणे, महेश कोरे, उत्कृष्ट छायालेखन - महेश आणे, महेश लिमये, उत्कृष्ट संकलन - अभिजित देशपांडे, विजय कलमकर, उत्कृष्ट ध्वनीमुद्रण - सतीश दडस, उत्कृष्ट ध्वनी संयोजन - संजय चतुर्वेदी, उत्कृष्ट वेशभूषा- गणेश लोणारे, शिवाजी करडे, उत्कृष्ट रंगभूषा - संजय सिंग, संतोष गिलबिले यांना तांत्रिक विभागातील पुरस्कार जाहीर झाले आहेत.

### ...या कलाकार, तंत्रज्ञांना संधी

नामांकनामध्ये उत्कृष्ट अभिनेता- सुनील बर्वे, मिलिंद शिंदे, गश्मीर महाजनी, उत्कृष्ट अभिनेत्री- स्वाती गोतावळे, नंदिनी चिकटे, सुरुची अडारकर, उत्कृष्ट विनोदी अभिनेत्री- श्वेता पारखे, रितिका श्रोत्री, तृप्ती शेडगे, उत्कृष्ट विनोदी अभिनेता - नितीन कुलकर्णी, अमेय परब, प्रकाश भागवत, सहायक अभिनेता- तारानाथ खिरतकर, जनार्दन कदम, धनंजय मांडवकर, सहायक अभिनेत्री - सुषमा देशपांडे, नम्रता संभेराव, क्षिती जोग, उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता - सुमित पाटील, जितेंद्र बर्डे, आदीश वैद्य, उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेत्री- भक्ती घोगरे, काजल परदेशी, अनघा राणे, सर्वोत्कृष्ट कथा- जयंत सोमलकर, जितेंद्र बर्डे, छत्रपाल निनावे, उत्कृष्ट पटकथा - जयंत सोमलकर, छत्रपाल निनावे, अमरजीत आमले, उत्कृष्ट संवाद- जयंत सोमलकर, राम खाटमोडे, विनोद वणवे, गणेश मंगेश पंडित, उत्कृष्ट गीत - गुरु ठाकूर, रॉकसन, अमरजीत आमले, उत्कृष्ट संगीत- अक्षय खोत, अमित राज, मोहित कुलकर्णी, उत्कृष्ट पार्श्वसंगीत- संतोष मुळेकर, समीर म्हात्रे, आदित्य बेडेकर, उत्कृष्ट पार्श्वगायक- अजय गोगावले, आदर्श शिंदे, हर्षवर्धन वावरे, उत्कृष्ट पार्श्वगायिका- आनंदी जोशी, राजेश्वरी पवार, आर्या आंबेकर, उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक - उमेश जाधव, राहुल ठोंबरे, सुजित कुमार यांचा समावेश आहे.

लोकमत

# ठाण्यात साकारणार राज्यातील सर्वांत मोठे नाट्यगृह; २,५०० प्रेक्षक क्षमता

## सरकारकडून १३८ कोटींचा निधी मंजूर; तब्बल ७,३०० चौरस मीटर क्षेत्रफळावर प्रकल्प

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** घोडबंदर रोडवरील वाघबीळ परिसरात लवकरच अत्याधुनिक आणि राज्यातील सर्वांत मोठे 'आप्पासाहेब धर्माधिकारी नाट्यगृह' उभारले जाणार आहे. सुमारे २,५०० प्रेक्षक क्षमतेचे हे नाट्यगृह सांस्कृतिक क्षेत्रासाठी एक मोठे पाऊल ठरणार असल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

नाट्यगृहाची संकल्पना मांडल्यानंतर सुरुवातीला निधी नव्हता. मात्र, महापालिकेच्या या नाट्यगृहासाठी राज्य शासनाने एकूण १३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यासाठी दोन शासन निर्णय काढले आहेत. पहिल्या टप्प्यात ८५ कोटी, तर दुसऱ्या टप्प्यात ५३ कोटींचा निधी वितरित केला आहे. येत्या तीन वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

सुमारे ७,३०० चौरस मीटर क्षेत्रफळावरील या नाट्यगृहामध्ये मुख्य सभागृहात १,६००, तसेच दोन बाल्कनीत प्रत्येकी सुमारे ४५० आसने असतील. विशेष म्हणजे, रंगमंचाची उंची 'गडकरी रंगायतन'पेक्षा तब्बल १२ मीटर अधिक ठेवण्यात येणार आहे, ज्यामुळे भव्य नाट्यप्रयोग सादर करणे शक्य होईल. नाट्यगृहाच्या परिसरातील सुमारे ६० टक्के जागा मोकळी ठेवून सुमारे दोन हजार चौरस मीटरचा प्रशस्त प्लाझा उभारण्यात येणार आहे. या प्लाझामध्ये एकावेळी १ हजार ५०० ते दोन हजार नागरिक उभे राहू शकतील, तसेच लाइव्ह इव्हेंट्स, सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करता येतील.

वाहनतळात सुमारे ६५० चारचाकी आणि ३०० दुचाकींसाठी पार्किंगची सोय असेल. याशिवाय दोन बेसमेंट आणि तीन मजल्यांवर पार्किंगची सुविधा दिली



### बँक्वेट हॉलमधून उत्पन्न मिळणार

कलाकारांसाठी स्वतंत्र लिफ्ट, बॅकस्टेज सुविधा, तसेच दोन मोठे बँक्वेट हॉल (प्रत्येकी १,००० क्षमतेचे) उभारण्यात येणार असून, त्यातून पालिकेला उत्पन्न मिळेल.

या प्रकल्पाच्या नियोजनासाठी लवकरच रंगकर्मी, दिग्दर्शक आणि कलाकारांची बैठक घेण्यात येणार असून, त्यांच्या सूचनांनुसार पुढील कामाला सुरुवात केली जाणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

### महापालिकेचे घोडबंदर रोडवर नवे नाट्यगृह

**प्रकल्प क्षेत्रफळ :** ७,३०० चौरस मीटर

**आसन व्यवस्था :** २,५०० प्रेक्षक

**पार्किंग :** ६५० चारचाकी, ३०० दुचाकी

**सुविधा :** ६ लिफ्ट, एस्कलेटर, प्रशस्त आसन व्यवस्थो

**नाट्यगृहाच्या रंगमंचाची उंची 'गडकरी रंगायतन'पेक्षा तब्बल १२ मीटर अधिक ठेवण्यात येणार आहे. प्लाझामध्ये एकावेळी १ हजार ५०० ते दोन हजार नागरिक उभे राहू शकतील.**

**सामना**

# 'भारतमाता'वरील मराठी ठसा पुसण्याचा डाव शिवसेनेने हाणून पाडला

## आज 'सुपर डुपर' मराठी सिनेमाचा भव्य प्रीमियर शो

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) – 'मराठी चित्रपटांचे माहेरघर' असलेले लालबागमधील भारतमाता सिनेमागृह नूतनीकरणानंतर नव्या स्वरूपात प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. मात्र या सिनेमागृहाच्या उद्घाटनालाच 'धुरंधर-२' या हिंदी चित्रपटाचा शो लावल्यामुळे मराठी सिनेप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती. भारतमातावरील मराठी ठसा पुसण्याचा डाव शिवसेनेने हाणून पाडला आहे. शिवसेनेच्या दणक्यानंतर सिनेमागृहाचे व्यवस्थापन ताळ्यावर आले असून उद्या, गुरुवारी सायंकाळी ५ वाजता 'सुपर डुपर' या मराठी चित्रपटाचा प्रीमियर शो ठेवण्यात आला आहे.

गिरणगावातील भारतमाता सिनेमागृहात आजवर अनेक मराठी चित्रपट प्रदर्शित झाले असून त्यांनी इतिहास रचला. अनेक दिग्गज कलाकारांची कारकीर्द भारतमाता सिनेमागृहामुळे बहरली. नूतनीकरणासाठी सहा वर्षे बंद असलेले हे सिनेमागृह २४ मार्चपासून पुन्हा एकदा खुले झाले. या सिनेमागृहात उद्घाटनालाच हिंदी चित्रपटाचा शो दाखविल्यामुळे तसेच सिनेमागृहामध्ये नोकरी देताना स्थानिक भूमिपुत्रांना डावल्यामुळे मराठी प्रेक्षकांमध्ये नाराजी होती.

या पार्श्वभूमीवर शिवसेना शाखा क्र. २०३ च्या वतीने भारतमाता सिनेमागृहाच्या व्यवस्थापनाची नुकतीच भेट घेतली. या सिनेमागृहामध्ये यापुढे फक्त मराठी चित्रपटांना प्राधान्य द्यावे तसेच स्थानिक मराठी तरुणांना तत्काळ नोकरी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी नगरसेविका भारती पेडणेकर, शाखाप्रमुख मिनार नाटळकर, उपशाखाप्रमुख अमित सातर्डेकर, प्रदीप वाटाणे आदी उपस्थित होते.



**स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी मिळणार**

*शिवसेनेच्या दणक्यानंतर भारतमाता सिनेमागृहाच्या व्यवस्थापन ताळ्यावर आले असून उद्या 'सुपर डुपर' या मराठी चित्रपटाचा प्रीमियर शो ठेवण्यात आला आहे. या शोसाठी शिवसेना नेते–खासदार अरविंद सावंत, आमदार अजय चौधरी, नगरसेविका भारती पेडणेकर व शाखाप्रमुख मिनार नाटळकर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी देण्याची शिवसेनेची मागणीदेखील व्यवस्थापनाने मान्य केली आहे.*

Mumbai Edition
Apr 02, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

**लोकमत**

मस्ट READ

# सिनेसृष्टीतील स्त्री विश्वाचा 'चित्रपताका'मध्ये वेध

## चित्रपट, सांस्कृतिक विकास महामंडळ त्रैमासिक प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने निर्मित व प्रकाशित केलेल्या 'चित्रपताका' या पहिल्या त्रैमासिकाचे प्रकाशन बुधवारी संपादक तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

'आंतरराष्ट्रीय महिला दिन' या विषयावर आधारित हे मासिक असून, जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या अंकात मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रीविश्व, स्त्री प्रतिमा आणि स्त्रीच्या सर्जनशील सहभागाचा वेध घेणारे लेख समाविष्ट केले आहेत.

सिनेमा या व्यापक कलामाध्यमाभोवती घडणारे विचारप्रवाह, त्यासंबंधीचे अनुभव आणि स्मृती यांविषयीचा रचनात्मक संवाद घडावा, या उद्देशाने महामंडळाने 'चित्रपताका' हे त्रैमासिक सुरू केले आहे. मराठी चित्रपटांमधील स्त्री-पात्रांच्या बदलत्या प्रवासाचा आढावा घेणारा लेख या अंकात आहे.

अभिनेत्री छाया कदम यांची मुलाखत, अलका कुबल यांनी चित्रनगरीबद्दल जागविलेल्या आठवणी या अंकात वाचता येतील. त्याचबरोबर बर्लिनच्या चित्रपट महोत्सवाचा प्रवास, मंथन उपक्रमाचा आढावा यात आहे.



'चित्रपताका'चे प्रकाशन करताना महामंडळाच्या स्वाती म्हसे-पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, मुख्य वित्तीय अधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे आदी.

**कलात्मक दृष्टी, प्रयोगशीलता, अभिव्यक्तीच्या वैविध्याचा परामर्श घेतलेला लेख आहे.**

### स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पनांचा प्रभाव

समाजातील बदलते संदर्भ, स्त्री स्वातंत्र्याच्या संकल्पना आणि बदलती मूल्यव्यवस्था यांचा प्रभाव मराठी चित्रपटांतील स्त्री प्रतिमांवर कसा उमटत गेला, याचे सूक्ष्म निरीक्षण या लेखातून समोर येते.

**दिग्दर्शनासारख्या सर्जनशील आणि नेतृत्वात्मक क्षेत्रात महिलांनी केलेल्या कामाचा मागोवा याशिवाय मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्री-दिग्दर्शकांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण आढावा आहे.**

Hello Mumbai
Page No. 4 Apr 07, 2026
Powered by: erelego.com

नवराष्ट्र
Mumbai | 04 April 2026 | Page 8

**मराठी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाचा साक्षीदार ठरलेले भारतमाता चित्रपटगृह तब्बल सहा वर्षांनंतर पुन्हा नव्या दिमाखात सुरु झाले आणि या नव्या रूपाच्या अनावरणाचा मान मिळाला तो झी स्टुडिओजच्या 'सुपर डुपर' या बहुप्रतीक्षित मराठी चित्रपटाला! या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत नुकताच या चित्रपटाचा भव्य प्रीमिअर सोहळा भारतमाता येथे अत्यंत जल्लोषात आणि मराठमोळ्या थाटात पार पडला.**

# भारतमातामध्ये 'सुपर डुपर'चा जल्लोषात प्रीमिअर!



भारतीय ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वातावरणात साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे केले.

मराठी संस्कृतीचा अभिमान आणि चित्रपटाचा उत्सव अशा दुहेरी स्वरूपात हा कार्यक्रम रंगला. यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, फिल्म सिटी कॉर्पोरेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, झी स्टुडिओजचे चीफ बिझनेस ऑफिसर उमेश कुमार बन्सल, झी स्टुडिओज मराठीचे व्यवसायप्रमुख बवेश जानवलेकर, सुपर डुपर चित्रपटातील कलाकार तंत्रज्ञ, निर्माते विजय शिंदे आणि नरेश बोर्डे यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. दिग्दर्शक समीर आशा पाटील म्हणाले, '' आशिष शेलार सर जेव्हापासून सांस्कृतिक कार्य मंत्री झाले, तेव्हापासून सांस्कृतिक मंत्रालयात एक सकारात्मक चित्र निर्माण झालं आहे. मराठी मनोरंजन क्षेत्रासाठी ते करत असलेल्या विविध उपक्रमातून, त्यांच्या कामातून सतत प्रेरणा मिळत राहते. या सोहळ्याला त्यांची उपस्थित लाभली, ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. 'सुपर डुपर' हा चित्रपटही तितकाच आनंद, प्रेम आणि उत्साह घेऊन प्रेक्षकांसमोर येत आहे आणि हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरेल, अशी मनापासून अपेक्षा व्यक्त करतो." झी स्टुडिओज प्रस्तुत, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित 'सुपर डुपर' हा एक कौटुंबिक मनोरंजनाचा महासोहळा ३ एप्रिल पासून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. समीर आशा पाटील लिखित–दिग्दर्शित या चित्रपटाचे निर्माते विजय शिंदे आणि नरेश बोर्डे असून, उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत. तर संजय जाधव यांनी छायांकनाची जबाबदारी सांभाळली आहे.



# १२ ते १५ नोव्हेंबरला 'चित्रपताका' महोत्सव

मुंबई, ता. ६ : राज्य शासनाचा अधिकृत 'चित्रपताका' चित्रपट महोत्सव यंदा १२ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार यांनी दिली.


मंत्री ॲड. आशीष शेलार यांच्या उपस्थितीत आज (ता. ६) पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे सांस्कृतिक कार्य विभागाची आढावा बैठक झाली. या बैठकीत मंत्री ॲड. शेलार यांनी माहिती दिली. या बैठकीस बैठकीस विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, उपसचिव नंदा राऊत तसेच उपसचिव महेश वाव्हळ उपस्थित होते. यंदा चार दिवसांचा हा महोत्सव अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचे निर्देश मंत्री ॲड. शेलार यांनी दिले.



# टोपीमागचं रहस्य उलगडलं!

**मुंबई टाइम्स टीम**

छोट्या पडद्यावर लोकप्रिय असलेल्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या सध्याच्या भागांमध्ये प्रेक्षकांना एक वेगळाच **प्रसाद ओक** पाहायला मिळतोय. कधी डोक्यावर टोपी, तर कधी रंगीत रुमाल बांधून तो प्रहसनांचा आस्वाद घेताना दिसतो आणि कलाकारांना मनापासून दाद देतो. पण या बदललेल्या स्टाइलमागचं कारण काय? हा प्रश्न चाहत्यांच्या मनात घर करून राहिला होता. आता या प्रश्नाचं उत्तर मिळालं आहे; ही केवळ फॅशन नसून, एका मोठ्या भूमिकेची तयारी आहे. प्रसाद ओक सध्या 'खंजिरीचे बोल' या आगामी सिनेमाच्या चित्रीकरणात व्यग्र आहे. या चित्रपटात तो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची भूमिका साकारत आहे. या भूमिकेशी पूर्णतः एकरूप होण्यासाठी प्रसादनं टक्कल केलं असून, त्याचा हा लूक लपवण्यासाठीच तो कार्यक्रमात टोपी किंवा रुमालाचा वापर करत असल्याचं दिसतंय. त्याच्या या समर्पणातून त्याची भूमिकेप्रति असलेली निष्ठा ठळकपणे दिसून येते.




'खंजिरीचे बोल' या सिनेमाचा मुहूर्त अलीकडेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाला. चित्रपटाचं दिग्दर्शन अनंत महादेवन करत आहेत. 'खंजिरीचे बोल' हा सिनेमा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित असून, तुकडोजी महाराजांची ग्रामगीता, समाज प्रबोधन आणि राष्ट्रभक्तीचा संदेश या चित्रपटातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रसादच्या नव्या लूकमुळे आणि उत्तम विषयामुळे 'खंजिरीचे बोल'बाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झालेली आहे. या सिनेमासाठी संशोधन आणि लेखन श्रीकांत बोजेवार यांनी केलं असून संगीत कौशल इनामदार यांनी दिलं आहे. तर संतोष फुटाणे यांनी चित्रपटाचं कला दिग्दर्शन केलंय. महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग तसंच महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ (फिल्मसिटी) निर्मित, या चित्रपटाची सहनिर्मिती शिवम यादव आणि कार्तिकी यादव करत आहेत.

# ‘चित्रपताका’ महोत्सव नोव्हेंबरमध्ये

**मुंबई :** राज्य सरकारचा ‘चित्रपताका’ चित्रपट महोत्सव यंदा १२ ते १५ नोव्हेंबरदरम्यान प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार यांनी दिली. गेल्या वर्षापासून आंतरराष्ट्रीय दर्जाचा ‘चित्रपताका’ मराठी चित्रपट महोत्सव सुरू करण्यात आला आहे. पहिल्याच वर्षी या महोत्सवाला चित्रपट रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.